**<u>ठळक बातम्या</u>**

- छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला विचार वैश्विक आहे, त्यांना महाराष्ट्रापुरतं मर्यादित ठेवू नका असं  केंद्रीय गृहमंत्र्यांचं आवाहन

- अरबी समुद्रात छत्रपती शिवरायांचं स्मारक उभारण्यासाठी राज्यशासन वचनबद्ध असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- हनुमान जयंती निमित्त राज्यात भक्तिपूर्ण कार्यक्रम

- तांत्रिक बिघाडामुळे देशभरात युपीआय सेवा विस्कळीत

**आणि**

- नागपूर जिल्ह्यात उमरेडमध्ये एका कारखान्यात झालेल्या स्फोटात ५ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला विचार वैश्विक आहे त्यांना महाराष्ट्रापुरता मर्यादित ठेवू नका असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. रायगड पर्यटन नव्हे तर प्रेरणास्थळ बनवण्यासाठी आपलं सरकार कटीबद्ध आहे, असं त्यांनी सांगितलं. शालेय विद्यार्थ्यांनी या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली

पाहिजे यासाठी उपाययोजना करण्याची सूचना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली.

**... होल्ड - बाईट- अमित शहा**

अरबी समुद्रात छत्रपती शिवरायांचं स्मारक उभारण्याचा प्रकल्प न्यायप्रविष्ट असल्याने थांबला आहे, तो पूर्ण करण्यासाठी राज्य शासन कसोशीने प्रयत्न करेल असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिलं. दिल्लीतही छत्रपतींचं स्मारक उभारावं अशी मागणी त्यांनी केली. भाजपाचे खासदार आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज छत्रपती उदयन राजे भोसले यांचंही यावेळी भाषण झालं. छत्रपती शिवरायांशी संबंधित पर्यटन स्थळांचं सर्किट विकसित करावं अशी मागणी त्यांनी केली.
कार्यक्रमापूर्वी अमित शहा यांनी पाचाड इथं जाऊन राजमाता जिजाऊ भोसले यांच्या समाधीला वंदन केलं. छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि मराठ्यांचा इतिहास तसंच संस्कृती यांच्यासाठी भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींचा या कार्यक्रमात रायगड स्मारक मंडळातर्फे सत्कार करण्यात आला.

**<><><><><>**

हनुमान जयंती आज सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हनुमान जयंती निमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील राज्याच्या नागरिकांना हनुमान जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**मुंबई**त ठिकठिकाणच्या हनुमान मंदिरांमधे दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली आहे. अनेक ठिकाणी सूर्योदयाच्या वेळी हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

**सांगली** जिल्ह्यात हनुमान जयंतीनिमित्त सकाळी अभिषेक, भजन, कीर्तन, आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे. सांगलीतल्या पंचमुखी मारुती मंदिरात विविध फळापासून सजावट केली आहे.

**नागपूरमध्ये** हनुमान मंदिरांमध्ये सकाळपासूनच भाविकांची गर्दी उसळली आहे. तेल, शेंदूर अर्पण करण्यासाठी भाविक रांगेत उभे आहेत. हनुमान जन्मोत्सवानिमित्त नागपुरात राजाबाक्षा आणि गिट्टीखदान इथल्या मंदिरातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे .

**अहिल्यानगर** जिल्ह्यात संगमनेरमध्ये प्रथेप्रमाणे महिलांनी हनुमानाचा रथ ओढून हनुमान जयंती साजरी केली.

**गोंदियात** शयन मुद्रेतल्या हनुमान मंदिरात दर्शना करता गर्दी झाली आहे.

**धुळे** शहरात सर्वच हनुमान मंदिरांत आज पहाटे पासून भाविकांची दर्शनासाठी गर्दी आहे. धुळे शहरातल्या प्राचीन पंचमुखी हनुमान मंदिरात आज जन्मोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं सुखोई-30 एमकेआय विमानातून लांब पल्ल्याच्या ग्लाइड बॉम्ब गौरवची यशस्वी चाचणी काल घेतली. या चाचणीत सुमारे १०० किलोमीटरचा पल्ला अचूकपणे पार

केल्याची माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली. गौरव हा एक हजार किलो ग्रॅम वजनाचा ग्लाइड बॉम्ब असून चंडीपूर इथल्या संशोधन केंद्रात तो विकसित केला आहे.

**<><><><><>**

देशभरात सध्या पोषण पंधरवडा राबवण्यात येत आहे. या अंतर्गत गरोदर तसंच स्तन्यदा माता, आणि बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीनं सकस आहार पुरवण्यावर भर दिला जात आहे. अहिल्यानगर ग्रामीणचे बालविकास प्रकल्प अधिकारी दीपक म्हेत्रे यांनी याविषयी माहिती दिली....

**होल्ड - बाईट - दीपक म्हेत्रे**

**<><><><><>**

केंद्राच्या भूविज्ञान मंत्रालयाकडून मुंबई विद्यापीठाच्या सागरी अभ्यास केंद्राला सागरी सूक्ष्मशैवाल जैवसंशोधनासाठी ७१ लाख ७४ हजार रुपयांचं अनुदान मंजूर झालं आहे.

भूविज्ञान मंत्रालयाच्या महत्त्वाकांक्षी ‘डीप ओशन मिशन’ कार्यक्रमांतर्गत सागरी सूक्ष्मशैवालच्या जैवसंशोधनावर आधारित एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी हे अनुदान मंजूर झालं आहे.

**<><><><><>**

अल्पसंख्यक व्यवहार मंत्रालयाचे सचिव डॉक्टर चंद्रशेखर कुमार यांनी आज सौदी अरेबियात जाऊन हज यात्रेच्या तयारीची पाहणी केली. हज

यात्रेसाठी राहण्याची उत्तम सोय आणि स्वच्छतेबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. हज यात्रेसाठी भाविकांना सुविधा पुरवण्यात सरकार कोणतीही कसर ठेवणार नाही असं अल्पसंख्यक व्यवहार मंत्रालयानं समाजमाध्यमाद्वारे म्हटलं आहे.

**<><><><><>**

तांत्रिक बिघाडामुळे देशभरात आज युपीआयच्या सेवा विस्कळीत झाल्यानं कोट्यावधी ग्राहकांची गैरसोय होत आहे. यामुळं अनेक बँकांच्या ॲपच्या कामावर परिणाम झाला आहे. ही तांत्रिक अडचण दूर करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियानं कळवलं आहे.

दररोज सरासरी ५९ कोटी व्यवहार युपीआय द्वारे होतात आणि त्यातून ८० हजार कोटी रुपयांची देवाणघेवाण होते.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरच्या अखनूर विभागात दहशतवाद्यांच्या टोळीचा प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरुन घुसखोरीचा प्रयत्न आज भारतीय लष्करानं हाणून पाडला. अखनूरमधे केरी भट्टल परिसरात काल रात्री काही सशस्त्र दहशतवाद्यांची हालचाल लष्करानं टिपली, आणि त्यांना शरण यायला सांगितलं. त्यानंतर झालेल्या चकमकीत लष्कराचा एक अधिकारी शहीद झाला. या प्रकारानंतर संबंधित क्षेत्रात बंदोबस्त वाढवण्यात आला असून शोध मोहीम तीव्र करण्यात आली आहे. तसंच जम्मू काश्मीरमधून दहशतवादाचं उच्चाटन होत

नाही तोपर्यंत दहशतवादविरोधी अभियान सुरू राहणार असल्याचं किश्तवाड - डोडा रामबन क्षेत्राचे महासंचालक श्रीधर पाटील यांनी सांगितलं आहे. किश्तवाडमधे सुरक्षा दलाच्या जवानांनी दोन दिवसांत तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांना ठार केलं. त्याचप्रमाणे सेना, सीआरपीएफ आणि जम्मू काश्मीर पोलिसांनी ९ एप्रिल रोजी केलेल्या कारवाईत तीन दहशतवादी मारले गेले.

**<><><><>**

छत्तीसगढच्या बिजापूर जिल्ह्यात आज सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत २ माओवादी ठार झाले. या जिल्ह्यात इंद्रावती जंगल परिसरात नक्षलविरोधी मोहीम राबवण्यात येत होती. त्यादरम्यान ही चकमक झाली. सुरक्षादलांनी दोन्ही माओवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. शोधमोहीम अद्याप सुरु आहे.

**<><><><>**

नागपूर जिल्ह्यात उमरेडमध्ये एका कारखान्यात झालेल्या स्फोटात ५ जणांचा मृत्यू झाला असून काही जण जखमी झाले आहेत. उमरेड औद्योगिक वसाहतीमध्ये अल्युमिनियम फॉइल बनवणाऱ्या MMP कंपनीत काल संध्याकाळी ही दुर्घटना घडली. स्फोट झाला तेव्हा दीडशे कामगार कारखान्यात होते. कंपनीत स्फोट झाल्याची माहिती मिळताच पोलिस यंत्रणा, अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली आणि आग आटोक्यात

आणली. रात्री उशिरा नागपूरचे जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांनी घटनास्थळाची पाहणी केली.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. पहिला सामना दुपारी लखनौ सुपर जायंट्स आणि गुजरात टायटन्स या दोन संघांमध्ये होणार असून संध्याकाळी साडेसात वाजता सनराइजर्स हैदराबाद आणि किंग्स इलेव्हन पंजाबमध्ये दुसरा सामना रंगणार आहे.

लखनौ इथं साडेतीन वाजता सामना सुरु होणार असून  लखनौ सुपर जायंट्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, गुजरात टायटन्सचा संघ आतापर्यंत झालेल्या पाचपैकी चार सामन्यांत विजय मिळवत गुणतालिकेत पहिल्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

अर्जेंटिना इथं सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा फेडरेशन आयोजित विश्वकरंडक स्पर्धेत भारतानं चार सुवर्णपदकं, २ रौप्य आणि २ कास्यपदकांसह आठ पदकं जिंकून चीननंतर दुसरं स्थान मिळवलं आहे. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी, सौरभ चौधरी आणि सुरुची सिंग या भारतीय जोडीने कांस्यपदक जिंकले, तर सिफ्ट कौर समरा, रुद्रांक्ष पाटील, सुरुची सिंग, विजयवीर सिद्धू, ईशा सिंग, चैन सिंग आणि आर्या बोरसे या खेळाडूंनीही चमकदार कामगिरी करत पदकांना गवसणी घातली.

**<><><><><>**

अमेरिकेत ३० दिवसांहून अधिक काळ वास्तव्यास असलेल्या सर्व परदेशी नागरिकांनी संघीय सरकारकडे नोंदणी करणं अनिवार्य असल्याचं अमेरिकी सरकारनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, दक्षिण महाराष्ट्र आणि कोकणाच्या काही भागात आज तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. नंदूरबारमध्ये आज तर छत्रपती संभाजी नगर, जालना, बीड आणि सोलापूरमध्ये उद्या मुसळधार पावसाठी हवामान विभागानं यलो अलर्ट दिला आहे.

**//<><><><><>//**